## सूर्यास्त

वे्ड नको लावू पुन्हा
झाली सांज वेळ
गूढ तुझ्या रंगांचा
मोहमयी खेळ

मनाचे ही अंतरंग
खुले तुझ्यासवे
ओळखीचे रंग तरी
रोज रोज नवे

सोन-पिवळ्या किरणांचे
क्षितिजी धूम-धुमारे
दूर कुठे शोध घेती
अल्लड पक्षी सारे

वेडावतो भुरभुरता
लाल - निळा शेला
भरजरी जांभळा ही
झळाळून गेला

जाता जाता केसरिया
फुलवी अंगार
मावळत्या दिशानाही
सावळी किनार

तुझ्या विना जीव जळे
रात्र सुन्न काळी
तुझ्या रंगी रंगलेली
सांज माझ्या भाळी

**संध्या रानडे**